महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९ वा मजला, न्यु.एक्सेलसिअर
बिल्डींग, ए.के.नायमक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
संकेतस्थळ : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

क्रमांक : बैठक-१८२०/प्र.क्र. ५९/प्रनिप्रा/५९५ दिनांक : 20 JUL 2021

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दिनांक २९ जुन, २०२१ रोजी सकाळी ११:०० व दुपारी ०३:०० वा.** झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या ३२व्या बैठकीचे इतिवृत्त,-

सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते,-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर,<br>माजी कुलगुरु,<br>महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | .... | सदस्य |
| २) | श्री. चिंतामणी जोशी (भा.प्र.से.),<br>सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा<br>आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य. | .... | सचिव |

प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) श्री. विश्वजीत व. माने (भा.प्र.से.) सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषिविषयक शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, ३) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा., ४) डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. व ५) डॉ. के.डी. चव्हाण, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक काही कारणास्तव बैठकीस गैरहजर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

डॉ. युवराज मलघे, सहसंचालक ,उच्च शिक्षण संचालनालय, मुंबई हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

प्राधिकरणाच्या उक्त बैठकींचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

विषय क्रमांक १: खालील तपशीलाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.

| अ. क्र. | विभाग | | अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १) | उच्च शिक्षण | सकाळी ११:०० वा. | बी.एड. |
| | | दुपारी ०३:०० वा. | बी.पी.एड. |

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), पुणे यांनी क्रमांक बीएड-३७२१/प्र.क्र.४९/सीईटीसेल/७१३६, दिनांक २२/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश मान्यतेबाबतचे अहवाल कोविड-१९ च्या पार्दुभावामुळे सादर करणे शक्य झाले नसल्याचे कळविले आहे.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) मधील तरतूदींचे अवलोकन केले असता, संबंधीत संचालकांनी प्रवेशाच्या अंतिम दिनांकापासून संबंधीत महाविद्यालयांनी सादर केलेल्या प्रवेश मंजुरीच्या प्रस्तावास अनुसरुन संचालनालयाने किती दिवसांत प्रवेश प्रमाणित करुन अहवाल सादर करावा, याबाबत कोणतेही निर्देश नाहीत, सबब वरील बाबी विचारात घेता सांगोपांग चर्चा करुन प्रवेश नियामक प्राधिकरणाने खालील प्रमाणे निर्देश दिले,-

१) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व्यावसायिक बी.एड., बी.पी.एड. व अन्य अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) नुसार प्रवेशाच्या अंतिम दिनांकपासून १५ दिवसांच्या आत, प्रवेश मंजुरीचे प्रस्ताव शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे यांना सादर करणे अनिवार्य आहे. तथापि, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये संबंधीत महाविद्यालयांनी उक्त नमूद अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार प्रक्रिया केली नसल्याचे सकृत दर्शनी स्पष्ट आहे. अधिनियम २०१५ मधील तरतूदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी या अनुषंगाने संबधीतांवर अधिनियम २०१५ मधील कलम क्रमांक २० अन्वये कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्याचा प्राधिकरणाने निर्णय घेतला आहे व तद्नुषंगाने दिनांक २५/०५/२०२१ रोजी उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व संबंधीत व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

तथापि, संचालनालय उच्च शिक्षण, पुणे यांनी याबाबत खालील प्रमाणे अहवाल प्राधिकरणास त्वरीत सादर करावा.

अ) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) नुसार प्रवेशाच्या अंतिम दिनांकपासून १५ दिवसांच्या आत, प्रवेश मंजुरीचे प्रस्ताव सादर केलेल्या महाविद्यालयांची अभ्यासक्रमनिहाय यादी.

ब) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) नुसार प्रवेशाच्या अंतिम दिनांकपासून १५ दिवसांच्या आत, प्रवेश मंजुरीचे प्रस्ताव उशिरा सादर केलेल्या महाविद्यालयांची अभ्यासक्रमनिहाय यादी.



(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

क) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) नुसार प्रवेशाच्या अंतिम दिनांकपासून १५ दिवसांच्या आत, प्रवेश मंजुरीचे प्रस्ताव सादर न केलेल्या महाविद्यालयांची अभ्यासक्रमनिहाय यादी.

२) प्रस्तूत प्रकरणी संबंधीत महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस च्या अनुषंगाने स्मरणपत्र निर्गमित करण्याबाबत सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करावी.

३) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक बी.एड. व बी.पी.एड. अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता विद्यार्थ्यांनी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास सादर केलेल्या प्रमाणपत्रांची निवडक पध्दतीने छाननी करण्यात आली.

४) शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक बी.एड. व बी.पी.एड. अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची पडताळणी झालेली नसल्याने सदरील अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास सद्यस्थितीमध्ये प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येणार नाही, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील बी.एड. व बी.पी.एड. अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची पडताळणी/छाननी प्रक्रिया संचालनालय स्तरावर लवकर करण्यात येईल, असे डॉ. युवराज मलघे, सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी प्राधिकरणास अवगत केले, या अनुषंगाने संबंधीत अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते संदर्भात निर्णय प्राधिकरणाच्या दिनांक १६ जुलै २०२१ रोजीच्या बैठकीमध्ये घेण्यात येईल, असे ठरविण्यात आले.

<u>विषय क्रमांक २ :</u> **<u>मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>**

अ) प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचे प्रवेश परीक्षेच्या मानधनाबाबत नेमलेल्या उपसमितीचा दिनांक १५/०३/२०२१ रोजीचा अहवाल.

प्राधिकरणाच्या दिनांक रोजीच्या पत्रान्वये प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाशी निगडीत प्रवेश परिक्षांकरिता अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय असणारे मानधन अदा करण्यासाठी श्री. एस.आर. भोसले, माजी संचालक, लेखा व कोषागारे, आणि स्थानिक निधी, महाराष्ट्र राज्य, डॉ. पी.एच. शिनगारे, माजी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य व सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य यांची उपसमिती गठित करण्यात आली होती.

या संदर्भात उपसमितीने दिनांक १५/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालास प्राधिकरण मान्यता देत आहे. या अहवालाची अंमलबजावणी दि.२२/०८/२०१९ (प्राधिकरण अस्तित्वात आल्यापासून) पासून करावी असेही निर्देश देण्यात येत आहेत.

16/7/21
(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

वरीलप्रमाणे विषय/अभ्यासक्रमनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 16/7/21

मा.अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई

प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
आवक क्र. 1612
दिनांक -8 JUN 2021

दिनांक १५/०३/२०२१

विषय - राज्य सीईटी कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरण या कार्यालयातील अधिकारी तसेच कर्मचारी यांचे प्रवेश परीक्षेच्या मानधनाबाबत नेमलेल्या समितीचा अहवाल..

संदर्भ -का.आदेश क्र. सीईटी / प्र.क्र./ त्रिसदस्यथी समिती/५७७/२०२०दि. २१/०७/२०२०.

आदरनिय महोदय,

उपरोक्त संदर्भीय कार्यालयीन ओदशान्वये राज्य सीईटी परीक्षा आणि प्रवेश नियामक प्राधिकरण अंतर्गत घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षेच्या कामासाठी कार्यरत असणारे परीक्षक / निरीक्षक/ अधिकारी आणि कर्मचारी यांचे मानधन ठरविण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या तीन बैठका झाल्या. सदर समितीने कार्यालयातील या विषयाचे अनुषंगिक संचिकाची तपासणी केली. समितीस असे आढळून आले की, याच विषयाचे अनुषंगाने कार्यालयाने सन २०१८ मध्ये श्री पी. ई. गायकवाड, निवृत्त भाप्रसे अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल दिनांक २७/१२/२०१८ रोजी कार्यालयास सादर केलेला असून सदरच्या अहवालास प्रवेश नियामक प्राधिकरणाने दिनांक २०/०२/२०१९ चे बैठकीत मंजुरी दिलेली आहे. सदर अहवालामध्ये काही बाबींबाबत स्पष्टता नसल्याने सदर अहवालाबाबत फेर विचार करुन सुधारित मानधन निश्चिती साठी प्रस्तुत समिती गठीत करण्यात आली आहे.

गायकवाड समितीने त्यांच्या अहवालात नमुद केलेल्या शिफारशीबाबत मुद्दे निहाय फेर विचार करुन सदर समितीने विचार विनिमय करुन एकमताने पुढीलप्रमाणे शिफारशी केलेल्या आहेत.

१.) शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, अशापत्र, दिनांक २२/०९/२०२० अन्वये एमएचसीईटी २०२० राज्य स्तरावर परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हा स्तरावर खालीलप्रमाणे समिती गठीत केलेली आहे

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परीषद | सहअध्यक्ष |
| निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य |
| जिल्हाकोषागार अधिकारी | सदस्य |
| जिल्हासमन्वयक अधिकारी महाऑनलाईन | सदस्य |
| जिल्हासुचना व विज्ञान अधिकारी | सदस्य |
| जिल्हासंपर्क अधिकारी | सदस्य सचिव |

उपरोक्त समितीने जिल्हास्तरावरील परीक्षा सुरळितपणे पार पडेल याबाबत नियोजन करुन दक्षता घ्यावयाची आहे. या ठिकाणी असे प्रस्तावित करण्यात येते की, सध्यास्थितीत राज्यात सर्व विषयांच्या सीईटी परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेतल्या जात असल्याने उपरोक्त समितीची पुर्नरचना करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबतचा निर्णय सीईटी कक्षाने घ्यावा.

(II) वरील समिती व्यतिरिक्त एमएच सीईटी परीक्षा घेण्यासाठी जिल्हास्तरावर उपकेंद्रप्रमुख म्हणुन उप केंद्राच्या संखेप्रमाणे उपकेंद्रप्रमुख नेमले जातात. जिल्हाधिकारी नाशिक , सांगली, रायगड, नंदुरबार, ठाणे या जिल्हयांचे प्राप्त प्रस्तावाची छाननी केली असता असे दिसुन येते की, एमएचसीईटी परीक्षा कालावधी हा सर्वसाधारण पणे १५ दिवसाचा असुन परीक्षा हि दोन सत्रात सर्व साधरणपणे

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(६)

१० ते १२ उपकेंद्रावर घेतली जाते. यासाठी उपकेंद्रप्रमुख म्हणुन नायब तहसिलदार दर्जाचे अधिकारी नेमले जातात या व्यतिरिक्त जिल्हा संपर्क अधिकारी म्हणुन अधिव्याख्याता तसेच काही उप जिल्हाधिकारी यांची नेमणुक केली जाते या कर्मचाऱ्यांचे मानधनाचे प्रस्तावांची पाहणी केली असता उपकेंद्रप्रमुख यांना प्रतिदिन रुपये ७००/- व उप जिल्हा संपर्क अधिकारी यांना रुपये ८००/- प्रति दिन याप्रमाणे दोन सत्राचे मानधन अदा केल्याचे दिसुन येते (७०० x २ सत्र = १४००) याव्यतिरिक्त प्रवास खर्च म्हणुन प्रतिकिमी रुपये ७ या दराने रुपये ७०० ते ८०० अदा केले असुन शासन नियमाप्रमाणे दैनिक भत्ता ही अदा केलेला आहे. यामुळे प्रतिदिन उपकेंद्रप्रमुख यांना सर्व साधारण पणे रुपये २२००/- पर्यंत रक्कम एकुण १५ दिवसाकरीता एकुण रक्कम रुपये ३५०००/- इतकी एका कर्मचारी वर्गास अदा केल्याचे दिसुन येते.

गायकवाड समितीने याबाबत दरनिश्चित करताना तत्कालीन परीक्षा पध्दतीचा विचार केल्याचे दिसुन येते (ऑफलाईन पध्दतीने एक दिवस परीक्षा व पुर्व तयारी एक दिवस). सन २०१९-२० पासुन एमएचटी सीईटी ऑनलाईन पध्दतीने साधारण १५ दिवस कालावधी मध्ये महाऑनलाईन यांच्यामार्फत सर्व जिल्हामध्ये विविध केंद्रावर घेतली जाते. सध्यस्थितीत परीक्षेचे बदलले स्वरुप पाहता गायकवाड समितीने शिफारस केलेल्या दरांमध्ये बदल करणे आवश्यक वाटते त्याअनुषंगाने समितीने खालील प्रमाणे दर शिफारस केलेले आहेत.

श्री गायकवाड समितीने उच्चशिक्षण, तंत्रशिक्षण, कला, कृषी, वैद्यकीय, आयुष अभ्यासक्रमातील प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षेकरीता जिल्हा स्तरावरील अधिकारी / कर्मचारी यांना देण्यात येणारा मेहनताना व मानधन अ.क्र. १ नुसार खालीलप्रमाणे शिफारस केले आहे. बदललेले प्रवेश परीक्षांचे स्वरुप विचारात घेता, या समितीने सुधारित दर अनुक्रमांक ४ प्रमाणे शिफारस केलेले आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | मेहेनताना प्रति सेशन / दिन | समितीने केलेली शिफारस |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | जिल्हाधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी/ निवासी उप जिल्हाधिकारी | रु.२,०००/- प्रति दिन | रुपये ५,०००/- ठोक रक्कम (या अधिकाऱ्यांना समन्वयाचे काम करावयाचे असल्याने ठोक मेहनताना प्रस्तावित करण्यात येत आहे) |
| २ | जिल्हांस्तरीय समिती सदस्य | रु.१,५००/- प्रति दिन | रुपये ४,०००/- ठोक रक्कम (या अधिकाऱ्यांना समन्वयाचे काम करावयाचे असल्याने ठोक मेहनताना प्रस्तावित करण्यात येत आहे) |
| ३ | विभागीय प्राधिकारी | रु.१,०००/- प्रति दिन | रुपये १,०००/- प्रति दिन (सन २०१९-२० पासुन विभागीय प्राधिकारी हे कार्यरत नसल्याने मेहनताना प्रस्तावित करण्यात येत नाही) |
| ४ | केंद्रप्रमुख (V.O.) उपकेद्र प्रमुख | रु.७००/- प्रति सेशन | रुपये ७००/- प्रति दिन (सध्यास्थितीत महाऑनलाईन एजन्सीमार्फत ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेत असल्यामुळ फक्त पर्यवेक्षकीय काम अपेक्षित आहे त्यामुळे मेहनताना प्रतिदिन प्रस्तावित) |
| ५ | जिल्हा संपर्क अधिकारी | रु.१,०००/- प्रति दिन | रुपये ५,०००/- ठोक रक्कम (या अधिकाऱ्यांन समन्वयाचे काम करावयाचे असल्याने ठोक मेहनताना प्रस्तावित करण्यात येत आहे) |
| ६ | उप जिल्हा संपर्क अधिकारी/ सहा.जिल्हा संपर्क अधिकारी | रु.८००/- प्रति दिन | रुपये ४,०००/- ठोक रक्कम (या अधिकाऱ्यांन समन्वयाचे काम करावयाचे असल्याने ठोक मेहनताना प्रस्तावित करण्यात येत आहे) |
| ७ | निरीक्षक | रु.८००/- | सध्यास्थितीत ऑनलाईन पध्दतीने परीक्षा राबविण्यात येते त्यामुळ सदर कर्मचारी वर्गाची आवश्यकता पडताळणी करुन प्रतिदिन निरीक्षकांसाठी रुपये ५००/- आणि |
| ८ | भरारी पथक सदस्य | रु.८००/- | |

१८/६/२१

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

3

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | वर्ग ३ कर्मचारी | रु.४००/- प्रति दिन | भरारी पथक सदस्य आणि वर्ग ३ कर्मचारी यांना प्रत्येकी रुपये ३००/- प्रतिदिन मानधन प्रस्तावित करण्यात येत आहे. |
| १० | चतुर्थश्रेणी कर्मचारी | रु.३००/- प्रति दिन | ऑनलाईन पध्दतीमध्ये सर्व व्यवस्था संबंधित केंद्रांने करावयाची असल्याने सदर कर्मचारी वर्गाची आवश्यकता पडताळून प्रतिदिन रुपये २००/- प्रमाणे मानधन शिफारस करण्यात येत आहे. |

केंद्रप्रमुख, उपकेंद्रप्रमुख यांची नेमणुक त्या त्या जिल्हामुख्यालयातील कर्मचाऱ्यामधुनच करणे अपेक्षित असल्याने त्यांना स्वतंत्र प्रवास खर्च देय राहणार नाही. तसेच उपरोक्त कर्मचारी / अधिकारी यांना प्रस्तावित दराने मानधन अदा करावयाचे असल्याने पुन्हा शासन दराने दैनिक भत्ता देय राहणार नाही. (अशाप्रकारे सध्यस्थितीत आकारणी काही जिल्हयामार्फत केली जात आहे) प्रतिवर्षी आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे मार्फत एमएचसीईटी साठी दिल्याजाणाऱ्या जिल्हास्तरीय समितीसाठी सुचनामध्ये जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांना अदा करावयाच्या मानधनाच्या दराबाबत स्पष्टता असावी. जेणेकरुन जिल्हास्तरावरुन समायोजन देयके सादर करताना योग्य त्या खर्चाचीच मागणी केली जाईल.

२.) श्री गायकवाड समितीने गोपनीय कामाकरीता कार्यरत मुख्यालयातील (सीईटी कक्ष आणि प्रवेश नियामक प्राधिकरण) अधिकारी / कर्मचारी यांचे साठी मानधन खालीप्रमाणे शिफारस केली आहे. त्यामध्ये या समितीने सुधारित दर अनुक्रमांक ४ प्रमाणे शिफारस केले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | सन २०१९-२० साठी प्रस्तावित दर | समितीने केलेली शिफारस |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | सक्षम प्राधिकारी | रु.१,५०,०००/- | रुपये ७५,०००/- प्रति परीक्षा जास्तीत जास्त रुपये ३ लक्ष प्रतिवर्षी<br><br>(आयुक्त, राज्य सीईटी कक्षामार्फत एकुण ७ ते ८ प्रकारच्या साप्ताहिक परीक्षा घेतल्या जातात त्यानुसार रुपये १,५०,००० प्रति परीक्षा याप्रमाणे मानधनाची आकारणी केली जात आहे. सदरची आकारणी हि अवाजवी वाटते त्यामुळे समितीने वरील प्रमाणे मानधन शिफारस केलेले आहे.) |
| २ | परिक्षा समन्वयक/वि.का.अ./सल्लागार (सक्षम प्राधिकाऱ्याच्या नियुक्तीने समकक्ष अधिकारी) | रु.१००,०००/- (प्रति ३ पेपर सेट)<br>रु.२,००,०००/- (प्रति ४ ते ९ पेपर सेट)<br>रु.३,००,०००/- (१० पेपर सेट पेक्षा जास्त) | एकंदरित कामकाजाचे स्वरुप पाहता वर्षभर पेपर सेटिंग, परीक्षा समन्वयक ,केंद्रिय प्रवेश प्रक्रिया, तक्रार निवारण इत्यादी सर्व प्रकारचे कामकाज सदर नियुक्त अधिकारी यांना करावे लागते. त्यामुळे या कामासाठी नेमणुक केलेल्या अधिकाऱ्यांना एका महिन्याचे मुळ वेतना इतके मानधन प्रतिवर्षी अदा करण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| ३ | प्रशासकीय अधिकारी/लेखा अधिकारी | रु. १,००,०००/- | एकंदरित कामाकाजाचे स्वरुप पाहता एका महिन्याच्या मुळ वेतनाच्या ५० टक्के इतके मानधन प्रतिवर्षी अदा करण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| ४ | वर्ग ३ कर्मचारी | रु. ५०,०००/- | एकंदरित कामाकाजाचे स्वरुप पाहता एका महिन्याच्या मुळ वेतनाच्या ५० टक्के इतके मानधन प्रतिवर्षी अदा करण्याची शिफारस करण्यात येत आहे. |
| ५ | वर्ग ४ कर्मचारी | रु. ३०,०००/- | एकंदरित कामाकाजाचे स्वरुप पाहता एका महिन्याच्या मुळ वेतनाच्या ५० टक्के इतके मानधन प्रतिवर्षी अदा करण्याची शिफारस करण्यात येत आहे. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(८)

प्रवेश नियामक प्राधिकरणाचे अध्यक्ष, सदस्य आणि सचिव तसेच प्राधिकरणामध्ये कार्यालयात इतर कर्मचारी (ज्यांची नेमणूक सीईटी प्रवेश परिक्षा कामासाठी केली जाईल.) हे महाराष्ट्र विना अनुदानित खाजगि शैक्षणिक संस्था (प्रवेश आणि फी) अधिनियम २०१५ मधील नियम ९ व १० अन्वये CET/CAP/CET Cell इत्यादी संविधानिक कामकाज करीत असल्याने त्यांना ही प्रतिवर्षी एक महिन्याच्या वेतनाइतके मानधन अदा करण्याबाबत समिती शिफारस करीत आहे.

३.) गोपनीय कामासाठी नेमणुक करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे मानधन त्यामध्ये या समितीने गायकवाड समितीने सुचविलेल्या दरात काही बदल केलेला नसुन अनुक्रमांक ४ प्रमाणे या समितीने दराबाबत अधिक स्पष्टता केलेली आहे.

| अ.क्र. | तपशिल | ठोक मानधन | समितीने केलेली शिफारस |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | पेपर सेटिंग (फेज १) | रु.६०/- प्रति प्रश्न | रु. ६०/- प्रति प्रश्न |
| २ | Moderator (फेज २) | रु. ४,०००/- | प्रति विषय संच ३०० एम सी क्यु साठी रु. ४,०००/- |
| ३ | Chief Moderator (फेज ३) | रु. ४,०००/- | प्रति विषय संच ३०० एम सी क्यु साठी रु. ४,०००/- |
| ४ | Chief Moderator (फेज ४) | रु. ५,०००/- | प्रति विषय संच ५०० एम सी क्यु साठी रु. ५,०००/- |
| ५ | टंकलेखन (गोपनीय) | प्रति प्रश्नपत्रिका रु. १०००/- (भाषा निहाय) | ५० एम सी क्यु चा एका प्रश्नपत्रिकेसाठी रु. १,०००/- (बाहय टंकलेखक असेल तरच लागु) |

अतिरिक्त फेरी (फेज) साठी Moderator / Chief Moderator फेज ४ चे दर लागु राहतील.

४.) सीईटी परीक्षेच्या वॉर रुम करीता राज्य सीईटी कक्षातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणारे मानधन त्यामध्ये गायकवाड समितीने सुचविलेल्या दरात बदल करुन अनुक्रमांक ४ प्रमाणे या समितीने सुधारित दर शिफारस केले आहेत. सदरचे दर शिफारस करताना समितीने वॉर रुमच्या कामाची पध्दती जाणुन घेतली यामध्ये प्रत्येक अधिकाऱ्यांची आठ तासासाठी नेमणुक केली जात असुन सदर अधिकारी हे राज्य सीईटी कक्षात समन्वयक अधिकारी म्हणुन कामकाज करतात परीक्षेत झालेला बदल (ऑनलाईन) विचारात घेऊन समितीने अनुक्रमांक ४ मधील दरांची शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | तपशिल | सन २०१९-२० पासुन ठोक मानधन प्रस्तावित दर (प्रतिदिन) | समितीने शिफारस केलेले दर (प्रतिदिन) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | सक्षम प्राधिकारी | रु. २,५००/- | रुपये १,५००/- |
| २ | परीक्षा समन्वयक | रु. २,०००/- | रुपये १,०००/- |
| ३ | सहाय्यक परीक्षा समन्वयक | रु. १,५००/- | रुपये ७५०/- |
| ४ | (अ) परीक्षा समन्वयक/सल्लागार /सहाय्यक परिक्षा समन्वयक/विशेष कार्य अधिकारी.<br>(ब) गोपनीय काम अपलोडींग अधिकारी | रु. १,५००/- | रुपये ७५०/- |
| ५ | पडताळणी अधिकारी | रु. १,०००/- | रुपये ५००/- |
| ६ | पडताळणी कर्मचारी | रु. ४००/- | रुपये २००/- |
| ७ | चतुर्थश्रेणी कर्मचारी | रु. ३००/- | रुपये १५०/- |

६/१२/१९

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

५) अ) विविध बैठकांसाठी तज्ञ / विशेष आमंत्रित / उपसिमितीचे अध्यक्ष / सदस्य (बाहेरील) यांना देण्यात येणारे मानधन रुपये ३,०००/- अधिक प्रवास भत्ता (प्रत्यक्ष प्रवास खर्च - ग्रेड पे प्रमाणे (टॅक्सी किंवा ऑटोचे बीलास अधिन राहुन)

ब) कार्यालयीन कामकाजासाठी बाहेरगावी जाणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना शासकीय नियमाप्रमाणे प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

क) विवक्षित कामासाठी नेमणुक केलेलया अधिकारी / कर्मचारी यांना भ्रमणध्वनी चार्जेस देय राहतील.

६) एमएएच एएसी सीईटी प्रवेश प्रक्रिया संबंधी गायकवाड समितीने यापुर्वी मंजुर केलेले दर अनुक्रमांक ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मान्य केले असुन या दरांबाबत अनुक्रमांक ४ मध्ये या समितीने या दरांबाबत स्पष्टता केली आहे.

| अ.क्र. | पद आणि कामाचे स्वरुप | | प्रस्तावित मानधन | समितीने केलेली शिफारस |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | | (३) | (४) |
| (अ) | वस्तुचित्रण, संकल्पचित्र, स्मरणचित्र या प्रात्यक्षिक विषयाच्या प्रश्नपत्रिका सेट तयार करणे | | रु.६,७५०/- प्रत्येकी | प्रत्येक विषयाच्या ४० प्रश्नांच्या एक प्रमाणे ३ विषयाच्या ३ प्रश्नपत्रिकेसाठी |
| (ब) | सामान्यज्ञान विषयाच्या प्रश्नपत्रिका सेट तयार करणे थिअरी विषय | प्रत्येक विषयासाठी ३ अधिव्याख्याता. | रु.३०००/- प्रत्येकी | ४० प्रश्नांच्या एका प्रश्नपत्रिकेसाठी |
| | | | रु. ९०००/- प्रत्येकी | ४० प्रश्नांच्या एका प्रश्नपत्रिका अशी ३ प्रश्नपत्रिकेसाठी |
| (क) | पेपर तपासनीस (प्रात्यक्षिक विषय) | पेपर तपासतांना एका परिक्षार्थीचा एका विषयाचा पेपर ५ पेपर तपासणीसांच्या मार्फत तपासण्यात येतो.(अंदाजित ८ दिवस) | रु.१०/- प्रत्येकी | प्रत्येक विषयाच्या प्रत्येक प्रात्याक्षिक उत्तरपत्रिकेसाठी, तपासनीकाच्या एका चुकीसाठी रुपये एक या प्रमाणात वजावट करण्यात येईल. |
| (ड) | सहाय्यक पेपर तपासनीस (प्रात्यक्षिक विषय) | गुणांची पडताळणी,मुल्यांकन सहाय्य | रु. ७/- प्रत्येकी | प्रत्येक विषयाच्या प्रत्येक प्रात्याक्षिक उत्तरपत्रिकेसाठी |
| (इ) | परीक्षा अधिकारी /अधिष्ठाता | परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका व परीक्षा वस्तु घेऊन जाणे. व उत्तरपत्रिका सिलबंद करुन सीईटी कार्यालयात सादर करणे,तसेच परीक्षा केंद्रावरील प्रक्रियेवर परीक्षा निरिक्षण करणे | रु.२,०००/- प्रति दिन | मान्य |
| (ई) | १) मुख्य पर्यवेक्षक | केंद्रातील प्रत्येक ब्लॉक मध्ये परीक्षा प्रक्रिया सुरळित पार पाडणे | रु. २०००/- प्रति दिन | प्रत्येक ५०० विद्यार्थ्यांसाठी एक |
| | २) पर्यवेक्षक (५ समवेक्षकाच्या मागे १ ) | | रु. ९००/- प्रति दिन | प्रत्येक १२५ विद्यार्थ्यांसाठी एक |
| | ३) समवेक्षक (प्रति २५ विद्यार्थ्यांकरीता १) | | रु. ९००/- प्रति दिन | मान्य |

अध्यक्ष

१६/३/१९

(८)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ४) तृतीय श्रेणी कर्मचारी | | रु. ४००/- प्रति दिन | ५० विद्यार्थ्यांसाठी एक कर्मचारी व रुपये ३००/- प्रतिदिन मानधन |
| | ५) चतुर्थ श्रेणी कर्मचारी | | रु. ३००/- प्रति दिन | २५ विद्यार्थ्यांसाठी एक कर्मचारी व रुपये २००/- प्रतिदिन मानधन |

वरील प्रमाणे समितीने मानधनाबाबत शिफारशी केलेल्या असुन याबाबत विभागाने सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने सविस्तर कार्यालयीन आदेश निर्गमित करणे जरुरीचे राहिल. प्रस्तावित सुधारीत दर दिनांक ०१/०४/२०२१ पासुन लागु राहतील.

(श्री सुनील भोसले),
त्रिसदस्यी समिती, अध्यक्ष
माजी संचालक,
लेखा व कोषागारे आणि स्थानिक निधी लेखा,महाराष्ट्र राज्य.

(डॉ. प्रविण शिनगारे),
त्रिसदस्यी समिती, सदस्य
माजी संचालक,
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, महाराष्ट्र राज्य

(श्री चिंतामणी जोशी),
सचिव तथा आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

६/२/२१

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य